<u>वाचा</u> :- शासन निर्णय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक राअअ-१११६/प्र.क्र.२४८/१४-अे, दि. २० जून, २०१७

**<u>प्रस्तावना :-</u>**

ऐतिहासिकदृष्ट्या, महाराष्ट्र हा भारतातील सर्वात जास्त औद्योगिकरण झालेले राज्य असून देशांतर्गत आणि परदेशी दोन्ही क्षेत्रातून आर्थिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर आकर्षित करीत आहे. वाढते शहरीकरण आणि वाढते उत्पन्न हे महाराष्ट्रातील रिटेल उद्योगाचे प्रमुख विकासक आहेत. वेगाने नागरीकरण होत असलेल्या महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याला अन्न प्रक्रिया क्षेत्रात विकासाला मोठ्या प्रमाणावर वाव आहे. अर्थव्यवस्थेत झालेली वाढ, खाण्याच्या प्रवृत्तीत बदल, उत्पन्नातील वाढीमुळे सुधारलेले जीवनमान आणि कुटुंबांमध्ये दुहेरी उत्पन्न असण्याकडे कल यामुळे राज्यात अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासाला फार मोठा वाव आहे.

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान (नॅशनल फुड प्रोसेसिंग मिशन) अंतर्गत सन २०१४-१५ पर्यंत अन्न प्रक्रिया उद्योगाला राज्यामध्ये चालना देण्यात येत होती. सन २०१५-१६ पासुन केंद्र शासनाकडुन दिनांक २७ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये सदर योजनेस केंद्रीय अर्थसहाय्य बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला व राज्य शासनाला सदर योजना राज्यस्तरीय योजना म्हणुन सुरु ठेवावी किंवा कसे याचा विचार करण्याबाबत कळविण्यात आले आहे. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांनी सन २०१६-१७ अर्थसंकल्प सादर करताना कृषि प्रक्रियेकरिता नवीन योजनेची घोषणा केली आहे. त्यानुषंगाने राज्याने मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना सन २०१७ दिनांक २० जून, २०१७ पासून लागू केलेली आहे. त्याअंतर्गत राज्याचे अन्न प्रक्रिया धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

याप्रकरणी अन्न प्रक्रिया धोरण लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यामधील प्रमुख बाबी खालील प्रमाणे आहेत:-

**अन्न प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन देणेकरिता नवीन धोरणाचे मुख्य मुद्दे :-**

**१) राज्यात कृषी प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन देण्याकरिता दोन स्वतंत्र संचालनालयांची स्थापना करणे :-**

अन्न प्रक्रिया उद्योगांच्या पायाभूत सुविधा देणे व चालना देण्यासाठी उद्योग आयुक्तांचे कार्यालयात संचालक दर्जाचे अधिकाऱ्यांच्या अधीन संचालनालय स्थापित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, अन्न प्रक्रिया उद्योगाना केंद्र व राज्य शासनाची वेगवेगळया अनुदानाच्या योजनांचा लाभ मिळवून देणेच्या योजनांची वैयक्तिक प्रकरणे हाताळणे तसेच उद्योगांना नवीन बाजारपेठ व तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे इ. सेवा उपलब्ध करण्याकरिता कृषी आयुक्तालयामध्ये अन्न प्रक्रिया संचालनालय स्थापित करण्यात येत आहे याकरीता नवीन पदनिर्मिती प्रस्तावित नाही.

**२) उद्योगाच्या सुलभतेसाठी मदत एक खिडकी मंजूरी प्रणाली :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्रात नवीन उद्योग स्थापित करणारे गुंतवणुकदारांना लागणाऱ्या विविध तऱ्हेच्या परवानग्या मिळवून देणेसाठी उद्योग विभागाने Maharashra Industry, Trade and Investment Facilitation Cell (Maitri) म्हणून राज्यस्तरावर एक खिडकी पध्दतीचा अवलंब करण्यास पुढाकार घेतला आहे. त्याप्रमाणे अन्नप्रक्रिया उदयोगामध्ये गुंतवणुकदारांना प्रकल्पास मंजुरी व त्या संबंधीत सेवा पुरविण्याकरीता जिल्हा स्तरावर एक खिडकी पध्दतीची सेवा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता राज्य ई-प्लॅटफार्म निर्मिती तयार करणे नियोजित आहे.

**३) कृषी विपणनकरिता पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे :-**

अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासासाठी राज्य सरकार संबंधित भौगोलिक क्षेत्रातील उत्पादनावर आधारित प्रक्रियेवर भर देऊन समूह विकसित करेल. बाजारभिमूख आणि उच्च मूल्य पिकांचे उत्पादन समूहाद्वारे केले जाईल. प्रत्येक समूहासाठी एक व्यापक मूल्य श्रृंखला धोरण विकसित करणे, तसेच सर्व सुविधासह अन्न प्रक्रिया उद्योग, मेगा फूड पार्क यांना प्रोत्साहन देणे शक्य होईल. त्यामुळे जोखीम कमी होऊन वैयक्तीक आर्थिक फायदा मिळण्यास मदत होईल. समुहांमध्ये मूल्य- श्रृंखला वृध्दींगत करण्यासाठी शासनाचे सर्व संबंधित विभाग जसे पशुसंवर्धन, सिंचन, उद्योग, वाणिज्य व विपणन इत्यादी अन्न प्रक्रिया विभागाशी समन्वय साधून अन्न प्रक्रिया उद्योगास चालना देतील. राज्याचे कृषी विभाग केंद्राच्या सूक्ष्म, लहान आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या मदतीने समुहांचा विकास करेल.

**४) दर्जेदार कच्च्या मालाची उपलब्धता :-**

कृषी प्रक्रिया उद्योजकांना गुणवत्तापूर्ण कच्चा माल उपलब्ध करुन, कृषी उत्पादनाच्या मुल्यवाढीस तथा अन्न प्रक्रिया उद्योग वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (APMC) कायद्यामध्ये सुधारणा करून, खाजगी बाजार, उत्पादकाकडून कृषी मालाची थेट खरेदी, कंत्राटी शेती, संगणकीय राष्ट्रीय कृषी बाजारपेठ निर्मितीसाठी e-NAM ची तरतूद करण्यात आली आहे. तसेच अन्न प्रक्रिया उद्योगांना दर्जेदार कच्च्या मालाची उपलब्धता सुलभ व्हावी याकरीता राज्यात गट शेतीची नवीन योजना सुरू करण्यात आली आहे.

**५) जमिनीची उपलब्धता :-**

कृषी प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन देण्याकरिता शेतकऱ्यांची जमीन दीर्घमुदतीच्या भाडेपट्टयाने व्यापारी तत्वावर कृषी प्रक्रिया उद्योजकांना कृषी उत्पादन घेण्यास उपलब्ध करुन घेण्याच्या सुविधांकरीता कायद्यात उचित बदलही करण्यात येणार आहे.

**६) अकृषिक परवानगी :-**

महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४२ च्या तरतुदीमध्ये सुधारणा करुन सूक्ष्म, लघू व मध्यम अन्नप्रक्रिया उदयोगांना अकृषीक परवान्याची आवश्यकता राहणार नाही व त्याचा वापर कृषि वापरामध्ये समजण्यात यावा, अशा तरतूदीचा समावेश करण्यात येईल.

**७) खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने लॉजिस्टीक पायाभूत सुविधा विकसित करणे :-**

कृषी प्रक्रियेचा विकास करण्याकरिता ग्रेडींग, पॅकिंग, प्री कूलिंग, फूड प्रोसेसिंग युनिट्स, लॉजिस्टिक्स पार्क, इंटिग्रेटेड कोल्ड चेन सोल्यूशन्स, लास्ट मैल जोडणी, सानुकूलीत वाहतूक, तंत्रज्ञानाचा वापर जसे बारकोडिंग, रेडिओ फ्रिक्वेन्सी ओळख (आरएफआयडीएस), टॅग्जची सोय, शेतीच्या मागे पुढे लागणाऱ्या किरकोळ पायाभूत सुविधा नियोजनबद्ध पद्धतीने खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने विकसित करण्यात येणार आहेत. लॉजिस्टिक्स क्षेत्रामध्ये अन्न प्रक्रिया व्यापाऱ्यांना प्रोत्साहन दिले जाईल. तसेच नाशवंत मालाच्या साठवणूकीसाठी जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट येथे तसेच रेल्वेच्या ठिकाणी समर्पित कार्गो हबची

स्थापना करण्यात येतील. स्थानिय अन्न प्रक्रिया उद्योगांना आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय बाजारपेठा उपलब्ध होण्यासाठी सहकार्य करण्यात येईल. यामुळे वाहतूक खर्चात बचत होण्याची आणि देशाच्या संपूर्ण लॉजिस्टीक नेटवर्कची क्षमता वाढणे अपेक्षित आहे. ज्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढून ग्राहकांना चांगली किंमत मिळेल.

**८) सुक्ष्म, लघु व मध्यम प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य :-**

१. शेतकऱ्यांच्या जीवनमानावर परिणाम करणाऱ्या तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणाऱ्या सुक्ष्म, लघु व मध्यम कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कमी दराने कर्ज उपलब्ध करुन देणेसाठी सुक्ष्म, लघु व मध्यम प्रक्रिया उद्योगांना शेती समतुल्य दर्जा देण्यात येईल.

२. शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडण्यासाठी तसेच गुंतवणुकीला चालना देण्यासाठी FPOs/FPCs यांना प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी वर्गीकरण, गुणांकण आणि पॅकेजिंगसाठी केंद्रीय आणि राज्य सरकारच्या विभागाकडून मदत करण्यात येईल.

**९) कामगार कायदा** :-

अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रथमदर्शी हंगामी उद्योगाचा दर्जा ग्राह्य धरावा. तथापि, विशिष्ट प्रकरणांत कृषि विभागाच्या सल्ल्याने कोणत्याही अन्न प्रक्रिया उद्योगाला त्याच्या वस्तूस्थितीच्या आधारे बिगर हंगामी ठरविण्याची कामगार कल्याण विभागास मुभा राहील, अशी कामगार कायद्यात तरतूद करण्यात येईल.

**१०) विद्युत शुल्कात सवलत :-**

सन २०२० पर्यंत अन्न प्रक्रिया उद्योग व त्याच्याशी निगडीत शीतसाखळी (Minus temperature सह ) प्रकल्पांकरीता वास्तविक खर्चावर आधारीत (At Cost) विदयुत शुल्क लागू करण्यात यावे. त्याच प्रमाणे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील D व $D^+$ झोनमधील औद्योगिक वसाहतींना शासनाने वीज दर, विद्युत शुल्क आणि इंधन समायोजन आकारात अनुज्ञेय केलेली सवलत कोकण विभागामध्ये स्थापन होणाऱ्या अन्न प्रक्रिया तथा फळ प्रक्रिया उद्योगांना देखिल लागू करण्यास मान्यता देण्यात यावी.

**११) पाण्याची सुविधा उपलब्ध करणे :-**

शेतमालावर आधारित सुक्ष्म, लघू व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना लागणाऱ्या पाण्याकरिता पाणी उपसा परवाना घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असा नियम लागू करण्यात येणार आहे. परंतु मोठे उद्योग व मेगा फूडपार्ककरिता विहित मुदतीत निर्णय घेण्याची कायदेशीर तरतुद करण्यात येईल.

**१२) प्रदूषण नियंत्रण :-**

ज्या कृषि/अन्न प्रक्रिया उद्योगांबाबत Effluent Discharge नाही, त्यांना पर्यावरण विभागाची उद्योग सुरू करण्याविषयक पुर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही.

**१३) कौशल्य विकास करणे :-**

कृषी आणि अन्न प्रक्रिया उद्योग, पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना मान्यता प्राप्त संस्थाकडुन उद्योगाशी संबंधित कौशल्य प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी,
आलेल्या खर्चाच्या ५० टक्केच्या मर्यादेत अर्थसहाय्यास पात्र ठरतील.

**१४) अन्न प्रक्रियेमध्ये महिलांना प्रोत्साहन देणे :-**

मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजनासह राज्य पुरस्कृत सर्व अन्न प्रक्रिया योजनेत १०० टक्के महिला गटाद्वारे स्थापित होणाऱ्या प्रकल्पांना अग्रक्रम देण्यात येईल.

**१५) सोलरव्दारे वीज निर्मिती करण्याची सुविधा :-**

अन्न प्रक्रिया उद्योगातर्फे सोलरव्दारे वीज निर्मिती करण्यात येत असेल व ती वितरणामार्फत वाहतूक करून वापरण्यात येत असेल, तर त्या विजेवर Wheeling Charges लागू राहील. परंतू, Countervailing Charges लागू करण्यापासून सुट देण्यात येईल.

**१६) प्रशासकीय रचना :-**

अन्नप्रक्रिया उद्योग व राज्य सरकार हे धोरणांच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी कटिबद्ध आहे. अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाने राज्यातील या क्षेत्रात अधिक गुंतवणूक करण्यास मदत केली आहे. फूड प्रोसेसिंग उद्योगाच्या सुदृढ विकासासाठी हे एक उपयुक्त वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने राज्य मदत करेल. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन ) यांचे अध्यक्षतेखाली संनियंत्रण व देखरेखीसाठी खालील प्रमाणे नियामक मंडळ राहिल.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) | अध्यक्ष |
| २ | मा. मंत्री (पणन) | सदस्य |
| ३ | मा. मंत्री (उद्योग) | सदस्य |
| ४ | मा. मंत्री (पदुम) | सदस्य |
| ५ | मा. मंत्री (सहकार) | सदस्य |
| ६ | मा. राज्यमंत्री (कृषि व फलोत्पादन) | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव (सहकार) | सदस्य |
| ८ | प्रधान सचिव (कृषि) | सदस्य |
| ९ | प्रधान सचिव (पणन) | सदस्य |
| १० | प्रधान सचिव / सचिव (उद्योग) | सदस्य |
| ११ | प्रधान सचिव / सचिव (पदुम) | सदस्य |
| १२ | आयुक्त (कृषि) | सदस्य सचिव |

**१७) आयुक्त स्तरीय अन्न प्रक्रिया प्रकल्प मंजूरी/मुल्यमापन समिती :-**

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | आयुक्त (कृषी ), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | अध्यक्ष |
| २ | आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| ३ | आयुक्त (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ४ | आयुक्त (दुग्ध व्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ५ | उप सचिव (कृषी प्रक्रिया) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ६ | उप सचिव (उद्योग-२),उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ७ | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य पणन मंडळ, पुणे. | सदस्य |
| ८ | समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल, शिवाजी नगर, पुणे. | सदस्य |
| ९ | संचालक ( कृषी प्रक्रिया), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य सचिव |

१८) राज्याचे “अन्न प्रक्रीया धोरण, २०१७” च्या अनुषंगाने सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्याशी संबंधित मुद्यांबाबत तात्काळ कार्यवाही करुन दि.३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंत आदेश निर्गमित करावेत.

१९) मेगा फूड पार्क, किसान संपदा, उद्योग विभागाचे सन १९८३ चे धोरण, मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजना, विद्युत दर/अधिभार इ. सवलत, या योजना सदर धोरणाचा भाग राहतील.

सोबत अन्न प्रक्रिया धोरणाची प्रत जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०२१५४५१२८९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( क.य.वंजारे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सहपत्र अन्न प्रक्रिया धोरणाची प्रत.

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
२. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे स्वीय सहायक,
३. मा. राज्यमंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे स्वीय सहायक,
४. मा. विरोधी पक्ष नेते, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई,
५. मा. विरोधी पक्ष नेते, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
८. अपर मुख्य सचिव (पर्यवरण), पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
९. प्रधान सचिव (पणन), पणन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१०. प्रधान सचिव (महसूल), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
११. प्रधान सचिव (कामगार), कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१२. प्रधान सचिव (उर्जा), उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१३. प्रधान सचिव (कौशल्य विकास व उदयोजकता), उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१४. सचिव (जलसंधारण), जलसंधारण व रोजगार हमी योजना ( अ. का.), मंत्रालय, मुंबई ३२,
१५. सचिव, (महिला व बाल विकास ), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१६. सचिव, (पदुम ), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१७. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१८. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
२०. संचालक (फलोत्पादन ), कृषि आयुक्तालय, पुणे,

२१. संचालक (प्रक्रिया व नियोजन ), कृषि आयुक्तालय, पुणे,
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२३. कक्ष अधिकारी (व्यय-१/अर्थसंकल्प -१३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२४. कक्ष अधिकारी (१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२५. सर्व कक्ष अधिकारी/अवर सचिव/उप सचिव/सहसचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६. निवड नस्ती/९-अे.

# महाराष्ट्र राज्याचे अन्न प्रक्रिया धोरण -२०१७
# कृषी व पदुम विभाग

**१. प्रस्तावना.**

ऐतिहासिकदृष्ट्या, महाराष्ट्र हा भारतातील सर्वात जास्त औद्योगिकरण झालेले राज्य आहे. देशांतर्गत आणि परदेशी दोन्ही क्षेत्रातून गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर आकर्षित करीत आहे. सन २०१२-१३ च्या किंमतीनुसार राज्याचे एकुण उत्पन्न रु.१७,९१,५०९ कोटी इतके अंदाजित करण्यात आले असुन, ते देशाच्या जीडीपीच्या तुलनेत १४.८ टक्के इतके आहे. यामध्ये कृषी आणि सहयोगी उपक्रम क्षेत्राचा वाटा १२.५ टक्के आहे. २०१०-११ च्या भूमापनाच्या आकडेवारीनुसार, राज्याचे एकूण ३०७.६ लक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्र असुन त्यापैकी २३१.१ लक्ष हेक्टर शेतीखालील क्षेत्र आहे.

२. लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य भारताचे दुसरे मोठे राज्य आहे. वाढते शहरीकरण आणि वाढते उत्पन्न हे महाराष्ट्रातील रिटेल उद्योगाचे प्रमुख विकासक आहेत. वेगाने नागरीकरण होत असलेल्या महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याला अन्न प्रक्रिया क्षेत्रात विकासाला मोठ्या प्रमाणावर वाव आहे. अर्थव्यवस्थेत झालेली वाढ, खाण्याच्या प्रवृत्तीत बदल, उत्पन्नातील वाढीमुळे सुधारलेले जीवनमान आणि कुटुंबांमध्ये दुहेरी उत्पन्न असण्याकडे कल यामुळे राज्यात अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासाला फार मोठा वाव आहे.

३. वेळेची कमतरता, व्यस्त जीवनशैली आणि बदलत्या वापरण्याच्या पद्धतीमुळे अन्न प्रक्रियेसाठी मागणी वाढली आहे. विविध अभ्यासावरुन असे स्पष्ट झाले आहे की, सामान्य भारतीय त्याच्या उत्पन्नाचा मोठा भाग अन्नाच्या वापरावर खर्च करतो. अन्नधान्यापासून ते उच्च उष्मांक उत्पादनाच्या वापराकडे होणाऱ्या बदलामुळे अन्नधान्याचा वापर कमी आहे जसे मास, दुध, मासे इत्यादी दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास कमी मुल्यावरुन जास्त मुल्याचे उत्पादन. ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत असलेल्या क्षेत्रांमध्ये खाण्याच्या पध्दतीमधील बदल सर्वाधिक आहे.

या वाढीची संधी ओळखून, बहुराष्ट्रीय खाद्य कंपन्यांनी, सुविधा आणि मूल्यवर्धित उत्पादनांच्या बाबतीत ग्राहकांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी या उद्योगात प्रवेश केला आहे. जसे अमेरिकन ब्रँड मॅकडोनाल्ड, पिझ्झा हट आणि केएफसी.

**२. महाराष्ट्रातील अन्न प्रक्रिया उद्योगाची सद्य:स्थिती :-**

महाराष्ट्र, ९ कृषी हवामान विषयक क्षेत्रे आणि वेगवेगळ्या जमिनीचे प्रकार, शेती विकासासाठी उपयुक्त असे एक जैव विविध राज्य आहे. राज्यात प्रक्रियाक्षम कच्च्या मालाच्या मुबलक उपलब्धतेमुळे अन्न प्रक्रिया उद्योगांकरिता अनुकूल परिस्थिती आहे. सन २०१०-११ मध्ये देशातील सर्वात मोठ्या नोंदणीकृत अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये (एफपीआय) महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर होता. अन्न प्रक्रिया उद्योगाने राज्यामध्ये सन २००० ते २०१७ या कालावधीत रुपये ५,४७,७३३ कोटी थेट विदेशी गुंतवणूक आकर्षित केली आहे. राज्यातील अन्न व कृषी क्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ (एमएआयडीसी), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) व खाजगी उद्योजकांनी मिळुन राज्यातील विविध फूड पार्क, वाईनपार्क आणि फुल झाडांच्या पार्कची स्थापना केली आहे. या मेगा फूड पार्क व फूडपार्कांचे स्थान याची माहिती खालील प्रमाणे आहे:-

**मेगा फूड पार्क/फूड पार्क**

| मेगा फूड पार्क | फूड पार्क |
|---|---|
| सातारा मेगा फूड पार्क, सातारा | मे.लक्ष्मी निर्मल प्रतिष्ठान, औरंगाबाद |
| पैठण मेगा फूड पार्क, औरंगाबाद | मे.हलदीराम कृषी उद्योग प्रा.लि., नागपूर |

| | |
|---|---|
| वर्धा मेगा फूड पार्क, वर्धा | मे.माँ उनिया औद्योगिक सहकारी वसाहत मर्या ,.कापसी, जि . नागपूर |
| | महाराष्ट्र कृषी  उद्योग विकास महामंडळ यांचे फूड पार्क, बुटीबोरी ,नागपूर |
| | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे फूड पार्क, विंचूर , जि .नाशिक |
| | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे फूड पार्क, पलस , जि .सांगली. |
| | ॲग्री फूड इन्फॉमेटीक्स इंडिया (सांगवी), जि. सातारा |

➢ या व्यतिरिक्त राज्यात मनुका, काजू, आंबा, संत्रा, टोमाटो, मसाला, तांदुळ, डाळ, सोयाबीन इत्यादीचे प्रक्रिया उद्योग समूह (Clusters) विकसित झालेले आहेत.

➢ महाराष्ट्रातील प्रमुख जैव-कृषी कंपन्यांमध्ये मॉनसन्टो, म्हाईको आणि अजित सिड्स यांचा समावेश आहे.

➢ राज्यात अलिकडेच New Holland Fiat and brewery giant Anheuser-Busch InBev. (AB InBev) तर्फे कृषी यंत्रसामग्रीमध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे.

➢ मद्य उत्पादनासाठी महाराष्ट्र एक महत्त्वाचे राज्य म्हणून उदयास आले आहे. महाराष्ट्रात ३५ पेक्षा जास्त वाइनरी आहेत आणि राज्यातील वाइन उत्पादनासाठी सुमारे १,५०० एकर जमीन द्राक्षांच्या लागवडीखाली आहे. महाराष्ट्र शासनाने लघु उद्योग म्हणून वाइन-निर्मिती व्यवसाय घोषित केला असुन त्यास अबकारी करात सवलतही दिली आहे.

➢ संयुक्त राष्ट्रांच्या औद्योगिक विकास संघटना (यूएनआयडीओ) ने भारतातील लहान व मध्यम उद्योगांचे ६० समूह अन्न प्रक्रिया क्षेत्रात सध्या अस्तित्वात असल्याचे म्हटले आहे. समुहाच्या वितरणावरुन असे स्पष्ट होते की, उद्योगाचे आकर्षण मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्र आणि गुजरात येथे आहे व त्यानंतर आंध्र प्रदेश, पंजाब आणि ओरिसाचे क्रमांक आहेत.

➢ राज्याची तांत्रिक क्षमता मजबुत असुन,  एकूण १८५ तांत्रिक संस्था असुन ज्यात १२,७३३ विद्यार्थ्यांची क्षमता आहे.

➢ शीतगृहे, वेअरहाउसिंग, प्रगत पॅकेजिंग आणि टेट्रा पॅकेजिंग आणि फूड टेस्टिंग प्रयोगशाळेसारख्या सुविधा असलेल्या सात आधुनिक फूड पार्क आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे नाशिकजवळील विंचुर येथे, नाशिकजवळील अतिरिक्त विंचुर आणि सांगलीजवळील पलस येथे तीन वाईन पार्क उभारले आहे.

➢ राज्यात २० विविध क्षेत्रात ८ उत्पादनांसाठी कृषी निर्यात क्षेत्रे आहेत.

➢ राज्यात ताज्या भाजीसाठी ३०% निर्यात क्षेत्रे आणि सुमारे ५०% प्रक्रियाकृत खाद्याचे निर्यात क्षेत्र आहे.

➢ राज्यात २.४३ लक्ष किलोमिटर इतके विस्तीर्ण रस्त्याचे जाळे आहे. सुमारे ९९% गावे रस्त्याने जोडली गेली आहेत. यात उत्कृष्ट वाहतुकीची सुविधा आहे आणि समुद्री बंदराशी  आणि विमानतळांच्या जोडणीमुळे चांगली वाहतूक व्यवस्था उपलब्ध आहे.

➢ मुंबई पोर्ट (एमपीटी) आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट (जेएनपीटी) हे राज्यातील प्रमुख बंदरे आहेत, जे प्रक्रियाकृत खाद्य उत्पादनांच्या निर्यातीसाठी वापरले जातात.

➢ राज्यात देशातील उच्चतम स्थापित क्षमता आणि वीज निर्मिती क्षमता आहे. या सर्वांमुळे या राज्याला गुंतवणुकीसाठी सर्वात आवडते स्थान (destination) मिळाले आहे.

➢ राज्यात तीन आंतरराष्ट्रीय व पाच राष्ट्रीय विमानतळे आहेत.

त्यामुळे महाराष्ट्र राज्य हे गुंतवणूकीसाठी सर्वात पसंतीचे राज्य बनले आहे.

## ३. राज्याचे प्रस्तावित कृषी व अन्न प्रक्रिया धोरण (प्रारुप)

### १) दृष्टिक्षेप (Vision) :-

महाराष्ट्र हे देशातील अन्न प्रक्रियेतील उद्योगाच्या जलद वाढीचे केंद्र बनत आहे.

### २) अभियान (Mission):-

अन्न प्रक्रियेमध्ये सर्वात जास्त गुंतवणूकीचे क्षेत्र बनविण्यासाठी व जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांना राज्यात प्रोत्साहन देण्यासाठी ठोस शाश्वत भुमिका स्विकारावी लागणार आहे. ज्या योगे महाराष्ट्र हे जागतिक गुंतवणूकदाराला आकर्षित करु शकेल.

### ३) धोरणाचा उद्देश :-

१) कृषी उद्योग गुंतवणूकीसाठी देशांतर्गत महाराष्ट्राला प्रथम क्रमांकावर ठेवण्यास प्रयत्नशील रहाणे.

२) राज्यातील अविकसित क्षेत्रात कृषी उद्योगात गुंतवणूक सतत होत राहील या दृष्टीने प्रयत्न करणे.

३) शेतकऱ्यांच्या शेतमालामध्ये वृध्दी करणे व रोजगारांच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करुन देणे.

### ४) धोरणांची उद्दिष्टे:-

➢ कृषी प्रक्रिया उद्योग क्षेत्राचा प्रती वर्षी दोन अंकी (Double Digit) वाढीचा दर साध्य करणे.

➢ कृषी उद्योग क्षेत्राच्या सहभागाने शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये पुढील ५ वर्षामध्ये दुप्पटीने वाढ करणे.

➢ सुमारे ५ लाख लोकांकरिता रोजगार निर्मिती करणे.

➢ कृषी मालाचे नुकसान टाळून त्याच्या मूल्यामध्ये वृध्दी करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना उत्तम किमंत मिळण्याची खात्री आणि ग्राहकांना स्वस्त व गुणवत्तापूर्ण उत्पादन उपलब्ध करुन देण्याची हमी देणे.

➢ कुपोषण आणि कुपोषणांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी अन्न प्रक्रियाद्वारे पोष्टीक समतोल आहाराची उपलब्धता करुन देणे.

➢ अन्न प्रक्रिया करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश करणे, तसेच अन्न सुरक्षा आणि नाशवंत कृषी उत्पादनाचा कार्यक्षमतेने वापर करुन पायाभूत सुविधांची निर्मिती करत अन्न पुरवठा साखळी मजबूत करणे. कच्चा माल उपलब्ध करुन घेण्यासाठी जाहिराती करणे त्याचप्रमाणे अन्न प्रक्रिया उद्योगांतर्गत स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे.

➢ कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांकरिता गुंतवणुकदाराना आकर्षित करण्याकरिता वातावरण निर्मिती करणे.

➢ कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांच्या विकासासाठी जास्तीत जास्त प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती करणे.

### ५) व्याख्या / परिभाषा :-

➢ **क्लस्टर:-** क्लस्टर म्हणजे एखादा नियोजित आणि जवळच्या क्षेत्रामध्ये स्थित, व्यवहार्य असलेला आणि समान / तत्सम उत्पादने / सेवा निर्माण करणाऱ्या उद्योगांचा एक गट. क्लस्टर मध्ये उद्योगांची आवश्यक वैशिष्ट्ये **(अ)** उत्पादनाच्या पद्धतींमध्ये समानता किंवा पूरकता, गुणवत्ता नियंत्रण आणि चाचणी, ऊर्जेचा वापर, प्रदूषण नियंत्रण इत्यादी, **(ब)** तंत्रज्ञान आणि विपणन धोरण / पध्दती मध्ये समानता, **(क)** क्लस्टरच्या सदस्यांमध्ये संवाद साधण्यासाठी माध्यम आणि **(ड)** सर्वसाधारण आव्हाने आणि संधी.

➢ **उपभोक्ता:-** उपभोक्ता म्हणजे अशी व्यक्ती आणि कुटुंबे जे त्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थची खरेदी आणि वापर करतात.

➢ **कृषी प्रक्रिया :-** शेती, दुग्धव्यवसाय, पशुपालन, मांस, पोल्ट्री किंवा मासेमारी इत्यादीच्या कच्च्या मालावर (ज्यात रोजगार, वीज, यंत्रे किंवा पैसा यांचा समावेश असेल) प्रक्रिया केल्यामूळे त्याच्या मूळ भौतिक गुणधर्मात बदल होत असेल, प्रक्रिया केलेल्या मालाला व्यावसायिक मूल्य असेल आणि मानवी व प्राण्यांच्या वापरासाठी योग्य असेल अशांचा समावेश कृषी प्रक्रियेमध्ये होईल. त्यात मालाचे मुल्यवर्धन प्रक्रिया,

अन्नपदार्थांची प्रभावीपणे जपवणूक करण्याकरिता अन्न पदार्थाच्या टिकाऊपणामध्ये वाढ करणे, त्याचा दर्जा सुधारणे आणि त्या कार्यशील राहतील या करिता वाळविणे इत्यादींचा देखील समावेश असेल.

- **अन्न उद्योग चालक :-** खाद्य सुरक्षा आणि मानके अधिनियम, २००६ मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, खाद्य उद्योगाशी संबंधित अन्न व्यवसायिक चालक म्हणजे ज्या व्यक्तीद्वारे व्यवसाय चालवला जातो किंवा मालकीचा असतो आणि कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार असतो.
- **खाद्य सुरक्षा :-** खाद्य सुरक्षा आणि मानक कायदा, २००६ मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे, अन्न सुरक्षा म्हणजे पदार्थाच्या प्रमाणकानुसार मानवी वापराकरिता योग्य अन्न पदार्थ.
- **फुड पार्क :-** फूड पार्क म्हणजे शेती, फलोत्पादन, पशुपालन, मांस, पोल्ट्री, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन इ. मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाचे स्थळ.
- MSME :- म्हणजे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे व त्यात वेळोवेळी केलेल्या सुधारणांप्रमाणे, सूक्ष्म, लहान आणि मध्यम उद्योग असतील.
- SME :- म्हणजे सूक्ष्म, लहान आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे व त्यात वेळोवेळी सुधारल्याप्रमाणे, लहान आणि मध्यम उद्योग असतील.

**६) अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्याकरिता भांडवली गुंतवणुक आकर्षित करण्यासाठी सद्याचे केंद्र व राज्य शासनाच्या प्रचलित योजना :-**

१. केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान संपदा योजना जाहिर केलेली आहे. सदरच्या योजनेत मिनी फूड पार्क स्थापित करणे, अस्तित्वात असलेले अन्न प्रक्रिया उद्योगाचे आधुनिकीकरण, अन्न प्रक्रिया क्लस्टरकरिता सामुदायिक सुविधा, फॉर्वर्ड व बॅकवर्ड (forward and backward linkage) लिंकेज निर्मिती, शीत साखळी, मनुष्यबळ निर्मिती इत्यादी योजनाचा समावेश आहे.

२. राज्याच्या १०० टक्के अर्थसहाय्यातून राबवावयाची मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना सन २०१७-१८ या वर्षापासून लागू करण्यात आली आहे. त्यात अन्न प्रक्रिया उद्योगांना कारखाना व यंत्रे आणि प्रक्रिया प्रकल्पासाठी मागे व पुढे कामासाठी अत्यावश्यक असणारी दालने यांच्या बांधकाम खर्चाच्या ३०% अनुदान, कमाल मर्यादा रु. ५०.०० लाख इतके अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. सदर योजना राष्ट्रीय अन्न प्रक्रिया मिशनच्या धर्तीवर सुरू करण्यात आली आहे.

३. अन्न प्रक्रिया निधीची निर्मिती - भारत सरकारने अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासासाठी सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे आणि त्यासाठी विशेष निधी उभारला आहे. नाबार्डकडून २,००० कोटी रुपये नामनिर्देशित फूड पार्क स्थापन करण्यासाठी माफक व्याजदरामध्ये कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल. याव्दारे वैयक्तीक अन्न प्रक्रिया युनिट स्थापन करण्यासाठी अधिसुचित केलेल्या फूड पार्कमध्ये शेतीप्रमाणेच सुक्ष्म व लघुउद्योग योजनांना अन्न प्रक्रियेमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी निवडलेल्या फूड पार्कमध्ये उद्योग उभारणीस कमी व्याज दराच्या कर्जाची सोय करण्यात आली आहे.

४. १००% परदेशी गुंतवणूक (अल्कोहोल, बिअर आणि लघु उद्योगांसाठी आरक्षित क्षेत्र वगळता ) आणि भांडवल आणि नफा हस्तांतरणाची परवानगी देण्यात आली आहे.

५. १००% निर्यातीवर आधारित उद्योगांना त्यांचे उत्पादन ५०% स्थानिक बाजारात विकण्यास परवानगी आहे. तसेच निर्यातीच्या उत्पन्नावर कॉर्पोरेट करात सूट देण्यात आली आहे.

६. शीत साखळी सुविधा उभारण्यासाठी आणि चालविण्यासाठी भांडवली खर्चावरील करामध्ये आणि गोदामाच्या सुविधेचा उपयोग व संचालन करण्यासाठी गुंतवणूकीशी निगडीत करामध्ये १०० टक्के कपात.

७. शीतसाखळी सुविधा उभारण्यासाठी आणि चालविण्यासाठी भांडवली खर्चावरील करामध्ये आणि गोदामांची सुविधा उभारण्यासाठी व चालविण्यासाठी गुंतवणूकीशी निगडीत करामध्ये १०० % कर प्रोत्साहन.

८. या क्षेत्राशी संबंधित उदा. फ्रॅगमेंटेशन, डिशायबिलिटी, कॉम्प्लेक्स सप्लाय चेन, मालाचा अपव्यय इत्यादीं समस्या विचारात घेता अन्न प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करण्याकरीता वेगळ्या धोरणाची गरज आहे.

**७) महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ अंतर्गत उद्योगांना जमीन धारण करण्याची सुविधाः-**

१. पायाभूत सुविधा पुरविणे. उदा. रस्ते तंत्रज्ञान व टाकाऊ पदार्थाचा, स्वच्छता पुर्नवापर इ. साठी प्रोत्साहन देण्यात येईल.

२. उदयोगांनी तयार केलेल्या मालाला जीएसटी मध्ये नमूद केलेल्या दरानुसार सूट/अनुदान दिले जाईल.

३. योग्य उदयोगाला अतिरिक्त ९०% Incentives १ वर्षाकरीता देणे.

४. ७५ % पाणीपट्टी सूट तसेच इलेक्ट्रिसिटी पुरविण्यामध्ये सूट देणे, पाणीपट्टी करीता १ लाख व इलेक्ट्रीसीटी सप्लायसाठी रक्कम रु. २ लाखापर्यंत सूट दिली जाऊ शकते. याबाबतचे ऑडीट अधिसूचित यंत्रणेकडून केले जाईल. तसेच ५० % भाग भांडवल पाणी साठवणूक उर्जा निर्मितीसाठी रक्कम रु. ५ लाखाच्या मर्यादेत पात्र उद्योगांना मंजूर केले जाऊ शकतात.

५. पात्र उद्योगांना अधिग्रहीत केलेल्या जमीनीवर स्टँप डयूटीमध्ये१०० % सूट दिली आहे. भाडेपट्टीचा अधिकार व विक्री प्रमाणपत्रासह आणि मुदतीच्या कर्जासाठी सुध्दा स्टँप डयूटीतून सूट फक्त आयटी आणि बीटी युनिटला दिली जाऊ शकते. पीएसआय २००७ च्या योजनेंतर्गत पात्र युनीटला स्टँप डयूटीतून सूट गुंतवणूक कालावधीसाठी मिळू शकते.

६. पात्र नविन युनिट्सला ज्या जिल्ह्यात उद्योग नाहीत व नक्शलवादीग्रस्त भागात सुध्दा इलेक्ट्रिसिटी चार्जेस मध्ये सूट दिली जाऊ शकते. उद्योग सुरु असलेल्या कालावधीत A आणि B भागात इलेक्ट्रिसिटी डयूटीमध्ये १००% सूट मोठया उद्योगांना आणि आयटी बीटी/युनीट करीता ७ वर्ष पर्यंत सूट दिली जाऊ शकते.

७. जलद गतीने जमिनीच्या वाढत्या किंमतीमुळे छोटे उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी जमिन मिळविणेकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील रिकाम्या जागा सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग उभारणीस वापरात आणणे शक्य आहे. नविन औद्योगिक वसाहतीमध्ये १०% क्षेत्र हे सुक्ष्म व लघु उद्योगासाठी राखुन ठेवले जाते.

**८) कृषी प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन देणेकरिता नवीन धोरणाचे मुख्य मुद्दे :-**

या धोरणाअंतर्गत राज्यात कृषी प्रक्रिया उद्योगास चालना देण्याकरिता आवश्यक पायाभूत सुविधाची निर्मिती, सामाईक सुविधा निर्माण करण्यास उद्योजकाना प्रवृत्त करण्याकरिता अस्तित्वात असलेली आर्थिक सवलतींच्या योजना तसेच, प्रक्रिया प्रकल्प उभारणी करिता चालु योजनेंतर्गत आर्थिक सवलती मिळविण्याची प्रक्रिया सहज व सुटसुटीत करणे यावर भर देण्यात येणार आहे. या धोरणाचे प्रमुख नवीन मुद्दे खालील प्रमाणे आहेत-

**१) राज्यात कृषी प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन देण्याकरिता दोन स्वतंत्र संचालनालयांची स्थापना करणे :-**

अन्न प्रक्रिया उद्योगांच्या पायाभूत सुविधा देणे व चालना देण्यासाठी उद्योग आयुक्तांचे कार्यालयात संचालक दर्जाचे अधिकाऱ्यांच्या अधीन संचालनालय स्थापित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तसेच, अन्न प्रक्रिया उद्योगाना केंद्र व राज्य शासनाची वेगवेगळया अनुदानाच्या योजनांचा लाभ मिळवून देणेच्या योजनांची वैयक्तिक प्रकरणे हाताळणे तसेच उद्योगांना नवीन बाजारपेठ व तंत्रज्ञान उपलब्ध करुन देणे इ. सेवा उपलब्ध

करिता कृषी आयुक्तालयामध्ये अन्न प्रक्रिया संचालनालय स्थापित करण्यात येत आहे याकरीता नवीन पदनिर्मिती प्रस्तावित नाही.

**२) उद्योगाच्या सुलभतेसाठी मदत, एक खिडकी मंजूरी प्रणाली :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्रात नवीन उद्योग स्थापित करणारे गुंतवणुकदारांना लागणाऱ्या विविध तऱ्हेच्या परवानग्या मिळवून देणेसाठी उद्योग विभागाने Maharashra Industry, Trade and Investment Facilitation Cell (Maitri) म्हणून राज्यस्तरावर एक खिडकी पध्दतीचा अवलंब करण्यास पुढाकार घेतला आहे. त्याप्रमाणे अन्नप्रक्रिया उदयोगामध्ये गुंतवणुकदारांना प्रकल्पास मंजुरी व त्या संबंधीत सेवा पुरविण्याकरीता जिल्हा स्तरावर एक खिडकी पध्दतीची सेवा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता राज्य ई-प्लॅटफार्म निर्मिती तयार करणे नियोजित आहे.

**३) कृषी विपणनकरिता पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे :-**

अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासासाठी राज्य सरकार संबंधित भौगोलिक क्षेत्रातील उत्पादनावर आधारित प्रक्रियेवर भर देऊन समूह विकसित करेल. बाजारभिमूख आणि उच्च मूल्य पिकांचे उत्पादन समूहाद्वारे केले जाईल. प्रत्येक समूहासाठी एक व्यापक मूल्य श्रृंखला धोरण विकसित करणे तसेच सर्व सुविधासह अन्न प्रक्रिया उद्योग, मेगा फूड पार्क यांना प्रोत्साहन देणे शक्य होईल. त्यामुळे जोखीम कमी होऊन वैयक्तीक आर्थिक फायदा मिळण्यास मदत होईल. समुहांमध्ये मूल्य- श्रृंखला वृध्दींगत करण्यासाठी शासनाचे सर्व संबंधित विभाग जसे पशुसंवर्धन, सिंचन, उद्योग, वाणिज्य व विपणन इत्यादी अन्न प्रक्रिया विभागाशी समन्वय साधून अन्न प्रक्रिया उद्योगास चालना देतील. राज्याचे कृषी विभाग केंद्राच्या सूक्ष्म, लहान आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या मदतीने समुहांचा विकास करेल.

**४) दर्जेदार कच्च्या मालाची उपलब्धता :-**

कृषी प्रक्रिया उद्योजकांना गुणवत्तापूर्ण कच्चा माल उपलब्ध करुन देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (APMC) कायद्यामध्ये सुधारणा करुन कृषी उत्पादनाच्या मूल्यवाढीस तथा अन्न प्रक्रिया उद्योग वाढीस प्रोत्साहन मिळेल अशा तरतुदींचा समावेश करण्यात येईल ज्यात आधुनिक खाजगी बाजार, कृषी मालाची थेट खरेदी, कंत्राटी शेती, संगणकीय राष्ट्रीय कृषी बाजारपेठा निर्मितीसाठी e-NAM चा समावेश राहील. तसेच दर्जेदार कच्च्या मालाची उपलब्धता सुलभ व्हावी याकरीता राज्यात गट शेतीची नवीन योजना मंजूर करण्यात आली आहे.

**५) जमिनीची उपलब्धता :-**

कृषी प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन देण्याकरिता शेतकऱ्यांची जमीन दीर्घमुदतीच्या भाडेपट्टयाने व्यापारी तत्वावर कृषी प्रक्रिया उद्योजकांना कृषी उत्पादन घेण्यास उपलब्ध करुन घेण्याच्या सुविधांकरीता कायद्यात उचित बदलही करण्यात येणार आहे.

**६) अकृषिक परवानगी :-**

महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४२ च्या तरतुदीमध्ये सुधारणा करुन सूक्ष्म, लघू व मध्यम अन्नप्रक्रिया उदयोगांना अकृषीक परवान्याची आवश्यकता राहणार नाही, व त्याचा वापर कृषि वापरामध्ये समजण्यात यावा, अशा तरतूदीचा समावेश करण्यात येईल.

**(७) खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने लॉजिस्टीक पायाभूत सुविधा विकसित करणे :-**

कृषी प्रक्रियेचा विकास करण्याकरिता ग्रेडींग, पॅकिंग, प्री कूलिंग, फूड प्रोसेसिंग युनिट्स, लॉजिस्टिक्स पार्क, इंटिग्रेटेड कोल्ड चेन सोल्यूशन्स, लास्ट मैल जोडणी, सानुकूलीत वाहतूक, तंत्रज्ञानाचा वापर जसे बारकोडिंग, रेडिओ फ्रिक्वेन्सी ओळख (आरएफआयडीएस), टॅग्जची सोय, शेतीच्या मागे पुढे लागणाऱ्या किरकोळ पायाभूत सुविधा नियोजनबद्ध पद्धतीने खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने विकसित करण्यात येणार आहेत.

लॉजिस्टिक्स क्षेत्रामध्ये अन्न प्रक्रिया व्यापाऱ्यांना प्रोत्साहन दिले जाईल. तसेच नाशवंत मालाच्या साठवणूकीसाठी जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट येथे तसेच रेल्वेच्या ठिकाणी समर्पित कार्गो हबची स्थापना करण्यात येतील. स्थानिय अन्न प्रक्रिया उद्योगांना, आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय बाजारपेठा उपलब्ध होण्यासाठी सहकार्य करण्यात येईल. यामुळे वाहतूक खर्चात बचत होण्याची आणि देशाच्या संपूर्ण लॉजिस्टीक नेटवर्कची क्षमता वाढणे अपेक्षित आहे. ज्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढून ग्राहकांना चांगली किंमत मिळेल.

**८) सुक्ष्म, लघु व मध्यम प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य :-**

१. शेतकऱ्यांच्या जीवनमानावर परिणाम करणाऱ्या तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणाऱ्या सुक्ष्म, लघु व मध्यम कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कमी दराने कर्ज उपलब्ध करुन देणेसाठी सुक्ष्म, लघु व मध्यम प्रक्रिया उद्योगांना शेतीचा दर्जा देण्यात येईल.

२. शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडण्यासाठी तसेच गुंतवणुकीला चालना देण्यासाठी FPOs/FPCs यांना प्राथमिक प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी वर्गीकरण, गुणांकण आणि पॅकेजिंगसाठी केंद्रीय आणि राज्य सरकारच्या विभागाकडून मदत करण्यात येईल.

**९) कामगार कायदा :-**

अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रथमदर्शी हंगामी उद्योगाचा दर्जा ग्राह्य धरावा. तथापि, विशिष्ट प्रकरणांत कृषि विभागाच्या सल्ल्याने कोणत्याही अन्न प्रक्रिया उद्योगाला त्याच्या वस्तूस्थितीच्या आधारे बिगर हंगामी ठरविण्याची कामगार कल्याण विभागास मुभा राहील, अशी कामगार कायद्यात तरतूद करण्यात येईल.

**१०) विद्युत शुल्कात सवलत :-**

सन २०२० पर्यंत अन्न प्रक्रिया उद्योग व त्याच्याशी निगडीत शीतसाखळी (Minus temperature सह ) प्रकल्पांकरीता वास्तविक खर्चावर आधारीत (At Cost) विदयुत शुल्क लागू करण्यात यावे. त्याच प्रमाणे मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील D व $D^+$ झोनमधील औद्योगिक वसाहतींना शासनाने वीज दर, विद्युत शुल्क आणि इंधन समायोजन आकारात अनुज्ञेय केलेली सवलत कोकण विभागामध्ये स्थापन होणाऱ्या अन्न प्रक्रिया तथा फळ प्रक्रिया उद्योगांना देखिल लागू करण्यास मान्यता देण्यात यावी.

**११) पाण्याची सुविधा उपलब्ध करणे :-**

शेतमालावर आधारित सुक्ष्म, लघू व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना लागणाऱ्या पाण्याकरिता पाणी उपसा परवाना घेण्याची आवश्यकता राहणार नाही, असा नियम लागू करण्यात येणार आहे. परंतु मोठे उद्योग व मेगा फूडपार्ककरिता विहित मुदतीत निर्णय घेण्याची कायदेशीर तरतुद करण्यात येईल.

**१२) प्रदूषण नियंत्रण:-**

ज्या कृषि/अन्न प्रक्रिया उद्योगांबाबत Effluent Discharge नाही, त्यांना पर्यावरण विभागाची उद्योग सुरू करण्याविषयक पुर्व परवानगीची आवश्यकता असणार नाही.

**१३) कौशल्य विकास करणे :-**

कृषी आणि अन्न प्रक्रिया उद्योग, पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना मान्यता प्राप्त संस्थाकडुन उद्योगाशी संबंधित कौशल्य प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी, आलेल्या खर्चाच्या ५० टक्केच्या मर्यादेत अर्थसहाय्यास प्राप्त ठरतील.

**१४) अन्न प्रक्रियेमध्ये महिलांना प्रोत्साहन देणे :-**

मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजनासह राज्य पुरस्कृत सर्व अन्न प्रक्रिया योजनेत १०० टक्के महिला गटाद्वारे स्थापित होणाऱ्या प्रकल्पांना अग्रक्रम देण्यात येईल.

**१५) सोलरव्दारे वीज निर्मिती करण्याची सुविधा :-**

अन्न प्रक्रिया उद्योगातर्फे सोलरव्दारे वीज निर्मिती करण्यात येत असेल व ती वितरणामार्फत वाहतूक करून वापरण्यात येत असेल, तर त्या विजेवर Wheeling Charges लागू राहील. परंतू, Countervailing Charges लागू करण्यापासून सुट देण्यात येईल.

**१६) सनियंत्रण व देखरेखीकरिता प्रशासकीय रचना :-**

राज्य सरकार हे अन्न प्रक्रिया उद्योग धोरणांच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी कटिबद्ध आहे. अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने राज्यातील या क्षेत्रात अधिक गुंतवणूक करण्यास मदत केली आहे. अन्न प्रक्रिया उद्योगांच्या सुदृढ विकासासाठी हे एक उपयुक्त वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने राज्य पुढाकार घेत आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे अध्यक्षतेखाली संनियंत्रण व देखरेखीसाठी खालील प्रमाणे नियामक मंडळ राहिल.

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | मा. मंत्री (कृषी व फलोत्पादन) | अध्यक्ष |
| २ | मा. मंत्री (पणन) | सदस्य |
| ३ | मा. मंत्री (उद्योग) | सदस्य |
| ४ | मा. मंत्री (पदुम) | सदस्य |
| ५ | मा. मंत्री (सहकार) | सदस्य |
| ६ | मा. राज्यमंत्री (कृषी व फलोत्पादन) | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव (सहकार) | सदस्य |
| ८ | प्रधान सचिव (कृषी) | सदस्य |
| ९ | प्रधान सचिव (पणन) | सदस्य |
| १० | प्रधान सचिव / सचिव (उद्योग) | सदस्य |
| ११ | प्रधान सचिव / सचिव (पदुम) | सदस्य |
| १२ | आयुक्त (कृषी) | सदस्य सचिव |

**१७) आयुक्त स्तरीय अन्न प्रक्रिया प्रकल्प मंजूरी समिती :-**

तसेच सदर योजनेसाठी प्राप्त प्रकल्पांची छाननी करुन त्यास मंजूरी देण्यासाठी आयुक्त स्तरीय प्रकल्प मंजूरी समिती खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | आयुक्त (कृषी ), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | अध्यक्ष |
| २ | आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| ३ | आयुक्त (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ४ | आयुक्त (दुग्ध व्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ५ | उप सचिव (कृषी प्रक्रिया) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ६ | उप सचिव (उद्योग-२),उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ७ | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य पणन मंडळ, पुणे. | सदस्य |
| ८ | समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, द्वारा बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल, शिवाजी नगर, पुणे. | सदस्य |
| ९ | संचालक ( कृषी प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य सचिव |